# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक:29.08.2026** **वार:शनिवार**

1. देशात साखरेची कमतरता नाही; केंद्र सरकारचा निर्वाळा; साखरेचा साठा मर्यादित ठेवण्याबाबत राज्य शासनाच्या सूचना
2. कडधान्य आत्मनिर्भरता अभियाना अंतर्गत प्रमाणित बियाण्यांच्या वितरणासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ
3. पुढच्या पाच वर्षांत नाशिक राज्याचं महत्त्वाचं ग्रोथ इंजिन ठरेल, मुख्यमंत्र्यांचा विश्वास आणि
4. नेपाळमधल्या पुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या 579वर, अजूनही हजारो लोक बेपत्ता

**साखर**

देशात साखरेची कोणतीही कमतरता नाही, वाजवी दरात पुरेश्या प्रमाणात साखर उपलब्ध करून देण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जातील असं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. साखरेचे भाव सुमारे 20 टक्क्यांनी कमी झाले असून किरकोळ बाजारातील भावही उतरू लागले आहेत. देशभरातील साखरेचे दर, साठा यावर सरकार बारकाईनं लक्ष ठेवून आहे असं ग्राहक व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**साखर निर्बंध**

केंद्र शासनानं साखरेच्या साठयावर घातलेल्या निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागानं साखर विक्रेते, वितरक आणि मोठ्या ग्राहकांसाठी साठा मर्यादेबाबत सूचना जारी केल्या आहेत. साखर विक्रेते आणि वितरकांना कोणत्याही वेळी किंवा कोणत्याही ठिकाणी चारशे मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा साठा ठेवता येणार नाही. तसंच, साखर प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांपेक्षा अधिक काळ साठा ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. दरमहा दहा मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखर वापरणाऱ्या मोठ्या ग्राहकांनाही साखर प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांपेक्षा अधिक काळ साठा ठेवता येणार नाही. साखरेच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी कालपासून विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

**कडधान्य अभियान**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरणासाठी केंद्र सरकारने अनुदानाच्या रकमेत मोठी वाढ केली आहे. केंद्राच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने काल सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यानुसार आता, तूर, उडीद आणि मसूर या कडधान्यांच्या बियाणांच्या किमतीच्या 100 टक्के किंवा कमाल 12 हजार रुपये प्रतिक्विंटल अनुदान देण्यात येणार असून, हरभरा आणि इतर कडधान्यांसाठी 75 टक्के किंवा कमाल 6 हजार रुपये प्रतिक्विंटल अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. सुधारित अनुदानामुळे शेतकऱ्यांना उत्तम प्रतीचे प्रमाणित बियाणं परवडणाऱ्या दरात उपलब्ध होईल, तसंच कडधान्यांचे उत्पादन आणि उत्पादकता वाढण्यास मोठी मदत होईल, अशी प्रतिक्रिया भरणे यांनी दिली आहे.

**फडणवीस-नाशिक**

पुढील पाच वर्षांत मुंबई आणि पुण्यानंतर नाशिक महाराष्ट्राचे महत्त्वाचे 'ग्रोथ इंजिन' ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल व्यक्त केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राच्या नाशिक उप- परिसर प्रशासकीय इमारतीचं लोकार्पण काल मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. नाशिकच्या वाढत्या औद्योगिक आणि आर्थिक विकासावर त्यांनी यावेळी प्रकाश टाकला. ते म्हणाले...

**मला अतिशय आनंद आहे की गेल्या 10-12 वर्षांमध्ये सातत्याने नाशिकला आपण वेगवेगळ्या पद्धतीने प्रोजेक्ट केलं या ठिकाणी वेगवेगळ्या क्षमता निर्माण केल्या आणि आज पुन्हा एकदा नाशिक हा या संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये परत रिबाऊंड करतोय आणि मी या ठिकाणी आजच सांगतो की पुढच्या पाच वर्षांमध्ये आपल्या महाराष्ट्रामध्ये मुंबई आणि पुण्याच्या खालोखाल एक महत्त्वाचं ग्रोथ इंजिन आपलं नाशिक असणार आहे हे आपण सगळ्यांनी लक्षात घेतलं पाहिजे.**

उद्यान विज्ञान, अन्न प्रक्रिया उद्योग, विमान संचालनशास्त्र, औषध निर्माण, जैवशास्त्र, वाहन तसंच उत्पादन क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे नाशिकमध्ये अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत आणि त्यामुळे नाशिक च्या विकासाला एक नवी गती मिळत आहे असं प्रतिपादन फडणवीस यांनी यावेळी केलं.

दिंडोरी तालुक्यातील मौजे चाचडगाव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या, कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचं उद्घाटनही काल फडणवीस यांच्या हस्ते झालं. तसंच नाशिक इथे भरवण्यात आलेल्या तीन दिवसीय महाकुंभ भक्ति संगम सोहोळयाचं काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन झालं. भारतीय संस्कृतीचा सर्वात मोठा अविष्कार असलेल्या या महासोहळ्याची सर्व कामे निर्धारीत वेळेत पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना दिली. नाशिक महापालिकेच्या 50 ई-बसेसचे लोकार्पणही फडणवीस यांच्या हस्ते काल झालं.

## राष्ट्रीय क्रीडा दिन

आज देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा होता आहे. या दिनाच्या औचित्याने पुण्यात आज आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात 'राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा 2026' या संकल्पनेवर आधारित विशेष टपाल पाकीटाचं प्रकाशन केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र आणि गोवा टपाल परिमंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असणार आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने होत असलेल्या या उपक्रमातून क्रीडा क्षेत्रातील योगदान आणि आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे.

## रक्षाबंधन

भावा-बहिणीच्या प्रेमाचं नातं साजरा करणारा रक्षाबांधनाचा सण काल देश तसंच राज्यभरात पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. **लातूर** आणि **सांगली**मध्ये झाडांना राखी बांधून, 'वृक्ष रक्षाबंधन' करण्यात आलं. **बीड** मध्ये पोलिस दलाकडून रक्षाबंधनाची भेट म्हणून, चोरीस गेलेले दागिने आणि अन्य मुद्देमाल नागरिकांना परत करण्यात आलं. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांतर्गत 'एक राखी सुरक्षेची' अभियान राबवण्यात आलं. **गडचिरोली**नजीकच्या नवेगाव येथील नवजीवन वसाहतीत, गडचिरोली पोलिसांनी, आत्मसमर्पित महिला माओवादी सदस्यांसोबत रक्षाबंधन सण साजरा केला. या कार्यक्रमात सुमारे 70 आत्मसमर्पित महिला माओवादी सहभागी झाल्या होत्या.

## धर्मस्वातंत्र्य कायदा

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, 2026 कालपासून राज्यात लागू झाला. बळजबरी, फसवणूक किंवा आमिष दाखवून बेकायदा धर्मांतर करायला आळा घालण्यासाठी कठोर तरतुदींचा समावेश या कायद्यात आहे. असं करणाऱ्यांना 7 वर्षांचा तुरुंगवास आणि 5 लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाऊ शकतो. तर गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास 10 वर्षं तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. स्वेच्छेनं धर्मांतर करायच्या किमान 60 दिवस आधी स्थानिक दंडाधिकाऱ्यांना पूर्वसूचना देणं या कायद्यामुळे बंधनकारक झालं आहे.

## अहिल्यादेवी होळकर पुरस्कार

राज्याच्या महिला आणि बालविकास विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. गेल्या चार वर्षांसाठीचे पुरस्कार काल जाहीर झाले. चंद्रपूर जिल्ह्यातील वनिता घुमे,

बुलडाणा जिल्ह्यातील तारामती जायभाये, नंदुरबार जिल्ह्यातील वंदना तोरवणे आणि लातूर इथल्या सुजाता माने यांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. त्याचबरोबर विभागस्तरीय 24 पुरस्कारांची घोषणाही काल करण्यात आली.

**प्रधानमंत्री जन धन**

'प्रधानमंत्री जन धन योजने'ला काल बारा वर्षे पूर्ण झाली. 'जन धन योजने'नं गेल्या 12 वर्षात अभूतपूर्व व्याप्ती आणि परिवर्तनकारी परिणाम साधले असून तिचा प्रभाव अद्वितीय राहिला असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत 59 कोटींहून अधिक खाती उघडण्यात आली असून, एकंदर 3 लाख 17 हजार कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या आहेत. या खात्यांपैकी 78 टक्के खाती ग्रामीण किंवा निम-शहरी भागातील असून 56 टक्के खाती महिला ग्राहकांची आहेत.

**FDI कारवाई**

अन्न आणि औषध प्रशासनानं पुण्यात काल मोठी कारवाई करत 'मेसर्स सिप्ला फार्मा अँड लाइफ सायन्सेस' या औषध निर्मिती कंपनीचा वडकी इथला औषध विक्री परवाना तात्काळ प्रभावानं रद्द केला आहे. जून महिन्यात केलेल्या काही औषधांवर नियमबाह्य जाहिरातवजा मजकूर छापल्याचं आढळलं होतं. ही औषधे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय देता येत नाहीत. याप्रकरणी 11 लाख रुपयांहून अधिक किंमतीचा साठा जप्त करून तो मागे घेण्याचे आदेश दिले होते.

**नेपाळ पूर**

नेपाळ आणि तिबेटमधील पुरातील मृतांची संख्या 579 वर पोहोचली आहे, तर 1924 लोक अजूनही बेपत्ता आहेत. बचाव कार्य युद्ध पातळीवर सुरू आहे. चीनच्या नैऋत्य भागात 5 पूर्णांक 1 रिखटर तीव्रतेचा भूकंप झाल्यामुळे आणखी पूर येण्याची भीती निर्माण झाली आहे; या पार्श्वभूमीवर प्रशासनानं 800 हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे. 'भोटे कोसी' नदी साखळीच्या उगमस्थानाजवळ जमा झालेल्या अडथळ्यांमुळे नव्यानं तयार झालेलं सरोवर आणि तिबेटच्या बाजूला असलेल्या धरणाला तडा गेल्याच्या शक्यतेमुळे पुराचा आणखी एक मोठा लोंढा येण्याची शक्यता निर्माण झाली असल्यामुळे चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार...